REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक तत्वज्ञान



**डॉ. शिला स्वामी**
**माधवराव पाटील कला व शास्त्र महाविद्यालय मुरुम,**
**ता. उमरगा जि. उस्मानाबाद.**

**सारांश :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक विचार मांडताना स्वातंत्र्यपूर्ण् काळाशी संबंधित असले तरी ने नवीन विचार चालू परिस्थितीशी अनुरुप आहेत. कारण आंबेडकरांच्या आर्थिक विचारांना एक भौतिक आधार होता. मानवी कल्याणाच्या दृष्टिने व विकासाच्या वर त्याचा कसा परिणाम होईल या दृष्टीकोनातून विचार मांडलेले दिसून येतात.

आर्थिक विचार मांडताना त्यांचा भारतीय आर्थिक प्रश्नांसंबंधीचा व्यासंग किती खोल हाता हेच दिसून येत. समाजवाद, बेकरीच समस्या, शेती विषयक विचार, उद्योगधंदे, खाजगी मालमत्तेसंबंधी विचार मांडताना त्यांनी खोल विचार करुन त्यासंबंधी आपले विचार मांडलेले होते.

भारतीय घटनेचे शिल्पकार, कायदामंत्री म्हणून जेवढे ख्यातनाम तितकेच आर्थिक विचारांचा गाढा अभ्यासक अर्थ शास्त्रज्ञ म्हणून प्रसिध्द असे विचार मांडलेले होते.

**प्रस्तावना :-**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी विविध स्वरुपांचे राजकीय, धार्मिक, सामाजिक इत्यादी विचारांबरोबर आर्थिक क्षेत्रात विचार मांडले भारताच्या व जगाच्या अर्थ व्यवस्थेची संशोधनात्मक निर्भिड व तर्कशुध्द मांडणी त्यांनी केली. समाजाच्या कल्याणासाठी आणि देशाच्या विकासासाठी कोणते आर्थिक धोरण व आर्थिक संरचना स्विकारली पाहिजे याचे बाबासाहेबांनी अभ्यासपूर्वक विश्लेषण केले आहे. परंतु तत्कालीन समाज व्यवस्थेने डॉ बाबासाहेब आंबेडकरांना एक थोर अर्थ तज्ञ म्हणून मान्यता दिलेली नव्हती. परंतु आधुनिक काळात डॉ बाबासाहेब आंबेडकर एक आर्थिक विचारवंत किंवा अर्थातज्ञ म्हणून उदयास आले.

१९१५ या वर्षी त्यांनी 'प्राचीन भारतीय वाणिज्य' या विषयावर शोध प्रबंध लिहून कोलंबिया विद्यापीठातून एम. ए. अर्थशास्त्र ही पदवी प्राप्त केली. त्यांच्या जून १९१६ या वर्षी सादर केलेल्या 'भारताचे राष्ट्रीय उत्पन्न : एक ऐतिहासिक व विश्लेषणात्मक अध्ययन' या प्रबंधास पी. एच. डी. ची मान्यता मिळाली. अर्थशास्त्रातील आधिक संशोधनासाठी त्यांनी जग प्रसिध्द अशा लंडन ऑफ इकॉनॉमिक ॲक्ट फोलिटीकल सायन्य या संस्थेमध्ये प्रवेश् घेतला. एम. एस्सी या उच्च पदवीचा शोध प्रबंध ब्रिटिश भारतातील राजशाही वित्ताचे प्रादेशिक विकेंद्रिकरण या विषयी होता. ब्रिटिश भारतातील प्रांतिक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती या त्यांच्या प्रबंधाबाबत जगप्रसिध्द अर्थतज्ञाने प्रशंसोद्‌गार काढले होते.

**उद्दीष्टे :-**

१) डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार जाणून घेणे.
२) शेती विषयक विकास संबंधी आंबेडकरांची दृष्टी जाणून घेणे.
३) चलन विषयक आंबेडकरांचे विचार अभ्यासणे.

**आर्थिक तत्वज्ञान :-**

तत्कालीन भारतीय अर्थव्यवस्था ही अत्यंत मागासलेली होती त्याचे कारण सांगताना आंबेडकर म्हणतात ग्रामीण अर्थ व्यवस्थेशी महत्वपूर्ण् असलेली जमीन कसण्याची परंपरागत पध्दत आणि भारतातील जातीव्यवस्था म्हणजे जाती जातीत भेद करणे हेच

मागासलेपणाचे कारण त्यांनी सांगितले. भारतात सरंजाम शाहीतील जाती व्यवस्था, उत्पादन साधने व साधन संपत्तीची विभागणी, जातीच्या आधारावर झालेली होती. सर्व जमिनदार उच्च जातीचे व कुळ कनिष्ठ जातीचे, अस्पृश्य तर शेंतमजूर म्हणून काम करीत. आज ही भारतातील उत्पादनाची साधने उच्च व मध्यम जातीचा लोकांच्या मालकाची आहे असे असल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास झालेला नाही.

## शेती विकासा विषयक विचार :-

भारत हा शेती प्रधान देश असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती विकासावर भर दिला पाहिजे असे प्रतिपादन केले आहे. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीय शेडयुल कास्ट्स फेडरेशनच्या जाहिर नाम्यात शेतीची उत्पादकता विढविण्यासाठी शेतीमध्ये यांत्रिकी करणाचा अवलंब करणे, खतांचा आणि उत्तम बी बीयाणांचा पुरवठा करणें, सिंचन आणि वीज निर्मितीवर भर देणे शेती उत्पादनाला जोड देण्यासाठी ग्रामीण लघुउदयोगधंदयांचा पुरस्कार करणे, शेतीत नवोपक्रम स्विकारणे, शेतीत आमुलाग्र बदल सुधारणा व्हाव्यात यासाठी विषेश कार्य केले होते.

## पायाभूत उद्योगधंदयांचे राष्ट्रीयकरण :-

शेतीच्या विकासाबराबरच उद्योगधंदयांचे राष्ट्रीयकरण व्हावे या संबंधीचे विचार आंबेडकरांनी मांडलेले होते. परंतु संपूर्ण उद्योगधंदयांचे राष्ट्रीयकरण न करता राष्ट्रहिताच्या दृष्टीने आवश्यक अशा मूलभूत व पायाभूत उद्योगधंदयांचे राष्ट्रीयकरण व्हावे व इतर सर्व उद्योग धंदे खाजगी क्षेत्रावर सोपवावे असे विचार प्रतिपादन केले होते.

## खाजगी मालमत्तेचे उच्चाटन :-

खाजगी मालमत्ता जवळ बाळगणा-यांच्या हक्कांला डॉ. बाबासाहेबांनी कधीच मूलभूत हक्क मानले नाही. याला त्यांनी विरोध केला आहे. त्याच्यामते मालमत्तेच्या अधिकारामुळे व्यक्ती स्वातंत्र्य व नि:पक्षपाती विचार करु शकत नाही. तसेच स्वातंत्र्य विचार मांडू शकत नाही. म्हणून खाजगी मालमत्तेच्या उच्चाटनाशी बाबासाहेब सहमत होते. परंतु खाजगी मालमत्तेचे समर्थन ही काही मर्यादित प्रमाणात करताना आंबेडकर दिसतात. विशेष म्हणजे सर्व साम्राज्य जनतेने न्याय रितीने संपत्तीचे किंवा मालमत्तेचे विभाजन करणे हा उदात्त हेतू त्यांच्या विचारामागे होता.

खाजगी मालमत्तेवर कर बसविण्यास बाबासाहेबांनी सतत पाठिंबा दर्शविला होता. आंबेडकरांच्या समकालीन परिस्थितीत अनेक देशांनी खाजगी मालमत्तेवर कर बसविणे आवश्यक मानले होते. ते कर देश विकासासाठी आवश्यक होते.

## चलनविषयक विचार :-

डॉ. आंबेडकरांनी मुलभूत समस्यांची उकल ही भारतीयांच्या सत्तेशिवाय होऊ शकणार नाही, असे विचार प्रतिपादले. द प्रॉब्लेम ऑफ रुपी (रुपयांची समस्या ) या विषययातील त्यांच्या प्रबंधास लंडन विद्यापीठाने त्यांना डी. एस्सी - ही पदवी १९२५ ला प्रदान केली. आंबेडकरांनी त्या काळात भारतात चालू असलेल्या सुवर्ण चलन पध्दतीस विरोध दर्शविला होता. सुवर्ण चलना ऐवजी सुवर्ण चलन विनिमय दर पध्दतीचा वापर व्हावा असे मत मांडले. कारण तोपर्यंत आपण रुपयांची क्रयशक्ती स्थिर ठेवू शकत नाही. चलनाचे मोठे संकट दूर करण्यासाठी विनिमय माध्यम (सुवर्ण) ठरु शकत नाही.

भारताच्या चलनविषयक विचार करण्यासाठी १९२५ मध्ये हिल्टन यंग यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या कमिशन पुढे साक्ष देताना आंबेडकराने देशाच्या विकासात चलनाचे किती महत्व आहे पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदा. रुपया नाणे पध्दती बंद करावी, सुवर्ण् कर निधी रद्द करावी. कारण व्यवसाय चलनाची स्थिरता राखण्यासाठी त्याचा उपयोग नसतो असे विचार मांडले. विनिमय परिणाम आणि सुवर्ण परिणाम निधी ही दोन्ही ही ज्या नाहीत अशी चलन पध्दती सुरु करणे हे अधिक योंग्य होय.

## संदर्भ :-

१. डॉ. वा. ना. कुबेर, डॉ आंबेडकरः विचारमंथन, लोकवाङमय गृह (प्रा.) मुंबई १९८२
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारधन मं. श्री दीक्षित.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गौरव ग्रंथ प्रा. आर. एस - सोळुंके.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई. कीर धनंजय,